आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
११ एप्रिल २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उत्तरप्रदेशातल्या तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन

- थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन

- अमेरिकेने टॅरिफ लागू करायला ९० दिवसांची स्थगिती दिल्यानंतर झालेल्या घडामोडींचे भारतीय शेअर बाजारांवर सकारात्मक परिणाम

**आणि**

- २६-११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याला १८ दिवसांची पोलिस कोठडी

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते वाराणसी इथं झालं. या प्रकल्पांमध्ये वाराणसीमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि रस्ते जोडणी प्रकल्पांचा समावेश आहे. वाराणसी रिंग रोड आणि सारनाथ दरम्यानचा रस्ते प्रकल्प, विद्युत क्षेत्रातील पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठीचा प्रकल्प, वाराणसी विभागात जौनपूर, चंदौली आणि गाजीपूर जिल्ह्यांमध्ये एक हजार ४५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या दोन पारेषण उपकेंद्राच्या दोन वाहिन्यांचं उद्घाटन आदी कामांचा सामावेश आहे. शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालय, ३५६ ग्रामीण ग्रंथालयं आणि १०० अंगणवाडी केंद्र यासह विविध प्रकल्पांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. जल

जीवन अभियानाअंतर्गत ३४५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या १३० ग्रामीण पेयजल योजनांचे उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. आयुष्मान भारत वयवंदन योजनेच्या काही लाभार्थ्यांना या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी कार्डाचं वाटप केलं. थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणात त्यांचं स्मरण केलं.....

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री**

उत्तरप्रदेशच्या राज्यपाल आनंदी पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि इतर मान्यवर तसंच राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रधानमंत्री मोदी आज मध्य प्रदेशात इसागढ इथल्या गुरुजी महाराज मंदिर आणि आनंदपूर धाम इथंही भेट देणार आहेत.

**<><><><><>**

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहिल, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या निवासस्थानी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर संदेशातून महात्मा फुले यांना अभिवादन केलं. देशातली प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी समाजव्यवस्था ही क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाईंची दूरदृष्टी, त्याग आणि परिश्रमांचे फळ आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फुले यांना आदरांजली वाहिली. फुले यांच्या जयंतीचं औचित्य साधत पवार यांनी पुण्यातल्या गंज पेठ इथल्या महात्मा फुले

वाड्याला भेट दिली. तिथं फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी फुले यांच्याशी संबधित छायाचित्रे आणि वस्तूंचा संग्रह असलेल्या संग्रहालयाची पाहणी केली.

<><><><><>

सृजनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या या काळात हे स्थान अबाधित राखण्याच्या उद्देशानं वेव्हज २०२५चं आयोजन मुंबईत होणार असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह वेव्हज उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

वेव्हज ही या क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी परिषद असून जगभरातल्या १०० पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यासोबतच अश्विनी वैष्णव आणि देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध रेल्वे प्रकल्पांच्या कामाचाही आढावा घेतला.

<><><><><>

वेव्हज २०२५ अंतर्गत खादीच्या वापराला उत्तेजन देण्याकरता नवकल्पना विकसित करण्यासाठी आयोजित केलेल्या मेक द वर्ल्ड वेअर खादी या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. त्याचबरोबर इनोव्हेट टू एज्यूकेट : हॅण्डहेल्ड डिवाईस डिझाईन चॅलेंज या स्पर्धेच्या दहा विजेत्यांची घोषणाही इंडियन डिजिटल गेमिंग सोसायटीने केली आहे. हे विजेते येत्या एक ते चार मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हजच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

<><><><><>

अमेरिकेने टॅरिफ लागू करायला ९० दिवसांची स्थगिती दिल्यानंतर झालेल्या घडामोडींचे सकारात्मक परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झाले. बाजार सुरू

झाल्यापासून ते दुपारपर्यंत ही वाढ कायम राहिली आहे. सध्या मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स पंधराशेहून अधिक अंकांनी वाढून ७५ हजार ३००च्या आसपास व्यवहार करतो आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ५०० पेक्षा जास्त अंकांनी वाढून २२ हजार ९००च्या आसपास व्यवहार करतो आहे.

**<><><><><>**

अमेरिकेने जाहीर केलेल्या आयात शुल्काला ९० दिवसांकरता स्थगिती दिल्यानंतर युरोपीय संघानंही प्रत्युत्तरात जाहीर केलेली आयात शुल्कवाढ थांबवली आहे. युरोपीयन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देल लेयेन यांनी काल समाजमाध्यमावर हा निर्णय जाहीर केला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी युरोपीय देशांमधून येणाऱ्या मालावर २५ टक्के आयात शुल्क लावण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर युरोपीय संघटनेनं प्रत्युत्तर देण्याचा निर्णय घेतला. नवीन टॅरिफ दर १५ एप्रिलनंतर लागू झाले असते. ते सध्या स्थगित करण्यात आले आहेत. दरम्यान या टॅरिफ युद्धाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटीश प्रधानमंत्री केर स्टार्मर आणि जपानचे प्रधानमंत्री शिगेरु इशिबा यांची काल चर्चा झाली. टॅरिफ युद्धाने कोणालाच फायदा होत नाही यावर त्यांच्यात सहमती झाली.

**<><><><><>**

अमेरिकेने जगाशी संवाद साधण्याचा आपला दृष्टिकोन मूलभूत स्तरावर बदलला असून त्याचे परिणाम प्रत्येक क्षेत्रात जाणवत आहेत, असं भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत होत असलेल्या ग्लोबल टेक समिटमध्ये ते बोलत होते. अमेरिकेची अर्थव्यवस्था ही जगातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, आणि तिला मोठी बनवण्यात तंत्रज्ञानाची मोठी भूमिका आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ईराणनं जाहीर केलेल्या आण्विक धोरणाबाबत अमेरिका त्यांच्याशी थेट चर्चा करणार असल्याचं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी आज सांगितलं. ही चर्चा उद्या ओमान इथं होणार असून त्यासाठी दोन्ही देशांची शिष्टमंडळं उद्या दुपारी मस्कतमध्ये दाखल होतील.

**<><><><><>**

२६-११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याला १८ दिवसांची पोलिस कोठडी पटियाला हाऊस न्यायालयाने दिली आहे. तहव्वूर राणाचं काल भारताकडे प्रत्यार्पण झालं.. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक काल संध्याकाळी विशेष विमानानं त्याला घेऊन नवी दिल्लीत पोहोचलं. त्यानंतर त्याला पटियाला हाऊस न्यायालयात हजर करण्यात आलं. तहव्वूर राणा याला मुंबई हल्ल्याप्रकरणी २००९मध्ये अमेरिकेत अटक झाली होती. या हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड हेडली याला मदत केल्याचा ठपका त्याच्यावर आहे. राणाचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. एका खासगी वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना अमित शहा म्हणाले....

**होल्ड बाईट...**

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकता नाईट राईडर या संघांमध्ये सामना होणार आहे. चेन्नईच्या चिदंबरम स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

देशात बहुतांश राज्यात उष्णतेची लाट आलेली असताना काही राज्यांमध्ये मात्र वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य प्रदेशात अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल तापमानात वाढ झाली होती. मात्र, आजपासून

पुढचे तीन दिवस वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि गारपीट होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

//<><><><><>//